# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
## प्रेसनोट

**CB/29/2026**

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २८/०५/२०२६ |
| --- | --- |

**‘‘ PIT NDPS अंतर्गत नवी मुंबई पोलीसांची कारवाई— आरोपी येरवडा कारागृह पुणे येथे एक वर्षाकरीता स्थानबध्द ’’**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलींद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे व पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी **‘‘नशा मुक्त भारत २०२८’’** या अभियानाच्या अनुषंगाने नवी मुंबई आयुक्तालयात अंमली पदार्थांच्या तस्करी विरुद्ध कठोर कारवाई करण्याबाबत आदेश दिले असुन वारंवार अंमली पदार्थ विषयक गुन्हे करणाऱ्या आरोपींवर PIT NDPS अंतर्गत प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित केले होते.

त्या अन्वये राजन बाळा राठोड, रा.अण्णाभाऊ साठे नगर, मानखुर्द, मुंबई—४३ याचेवर नवी मुंबई व मुंबई येथे एनडीपीएस कायद्यांर्गत एकुण ०४ गुन्हे तसेच भादंवि कायद्यान्वये ०५ गुन्हे (खुनाचा प्रयत्न, मारामारी, दरोडा) दाखल असुन सदर आरोपी हा मुंबई येथुन नवी मुंबई येथे येवुन अंमली पदार्थाची विक्री करीत होता. सदरचा आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याने त्याचेवर PIT NDPS अंतर्गत गृहमंत्रालय, मुंबई येथे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव गृह मंत्रायल, मुंबई यांचेकडुन मंजुर करण्यात आला असुन नमुद आरोपी राजन बाळा राठोड यास एक वर्षाकरीता येरवडा कारागृह पुणे येथे स्थानबध्द करण्यात आले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडुन PIT NDPS अंतर्गत करण्यात आलेली ही पहीली व महाराष्ट्र राज्यातील दुसरी कारवाई आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री.धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वपोनि/श्री.संदीप निगडे, सपोनि/देवेंद्र ओव्हाळ, सपोनि/निलेश धुमाळ, सपोनि/तुषार माने, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोहवा/४४६३ पदु दोरे, पोहवा/४४७६ गणेश पवार, पोना/४४६२ अंकुश म्हात्रे, पोना/२८७९ महेंद्र अहिरे, मपोना/ २७९४ हेमांगी पाटील यांनी केली आहे.

★★★★★★★★★★